GEECEE

**January 02, 2026**

**To**
**The Listing and Compliance**
**Bombay Stock Exchange Ltd.**
**Phiroze Jeejeebhoy Towers**
**Dalal Street**
**Mumbai - 400 001**
**Fax No. 91-22-22722039/41/61**
**Email: corp.relations@bseindia.com**
**BSE – Scrip Code: 532764**

**To**
**The Listing Department**
**The National Stock Exchange of India Ltd**
**"Exchange Plaza"**
**Bandra Kurla Complex,**
**Bandra (E), Mumbai – 400 051**
**Fax No. 91-22-26598237/38**
**cmlist@nse.co.in cmtrade@nse.co.in**
**NSE: GEECEE**

**Dear Sir / Madam,**

**Sub: Newspaper publication regarding special window for re-lodgement of transfer requests of physical shares of Geecee Ventures Limited**

**Ref: SEBI Circular No. SEBI/HO/MIRSD/MIRSD-PoD/P/CIR/2025/97 dated July 02, 2025**

Please find enclosed extracts of the newspaper publications published in newspapers, Business Standard in English and Pratahkal in Marathi on Thursday, January 01, 2026 informing about notice of Special window for re-lodgement of transfer requests of physical shares.

The above information are also being made available on the Company's website at www.geeceeventures.com

Kindly take the same on your records.

Yours faithfully,
For **Geecee Ventures Limited**

DARSHANA JAIN
Digitally signed by DARSHANA JAIN
Date: 2026.01.02 15:31:50 +05'30'

**Darshana Jain**
**Company Secretary and Compliance Officer**
**Membership No: A73425**
**Place: Mumbai**
**Encl: a.a**

# Food delivery, qcom firms raise incentives amid gig workers' strike

**UDISHA SRIVASTAV**
New Delhi, 31 December

Food delivery and quick commerce (qcom) companies, including Swiggy, Zomato, Blinkit, Instamart, and Zepto, increased payouts and rolled out additional incentives for delivery partners on Wednesday (December 31), as New Year's Eve (NYE) remains one of the busiest days of the year for these platforms.

While the hikes in per-order payouts and incentives are a usual phenomenon during festive periods and peak-demand occasions, the development also comes at a time when several gig worker unions have called for a nationwide strike. Workers are protesting low pay structures, poor working conditions, long working hours, arbitrary deactivation of IDs, and lack of medical facilities, emergency support, and social security.

In a joint statement, Telangana Gig and Platform Workers Union (TGPWU), and Indian Federation of App-based Transport Workers (IFAT) have said: "As of last night, over 170,000 delivery and app-based workers across India have confirmed participation, with numbers expected to rise further by evening."

As a result, to ensure adequate availability of delivery partners and smooth business operations, various companies are offering several attractive incentives.

In a social media post, Zomato said that over 23,000 delivery partners earned more than ₹1,500 on Christmas Day (December 25). It added that workers can earn up to ₹3,000 on NYE. Notably, the platform is offering up to ₹150 per order between 6 pm and midnight on food deliveries. Similar to Zomato, Swiggy is also advertising peak-hour earnings (6 pm-12 midnight) of ₹2,000.

On the qcom side, Raj, a 24-year-old delivery partner working at Swiggy Instamart, shared that the company is giving incentives worth ₹1,000 on 20 orders, ₹1,600 on 30 orders, ₹2,400 on 40 orders, and ₹3,000 on 45 orders, and so on. "On normal days, the incentive is usually around ₹145 for 17 orders, and ₹210 for 20 orders," he added.

Another delivery partner working at Blinkit and Zepto mentioned that both companies have increased their incentives significantly for NYE and for January 1. The partner showed on this mobile application that Blinkit is offering incentives of ₹495 on earnings of ₹626, ₹685 on earnings of ₹754, ₹896 on earnings of ₹908, ₹1,097 on earnings of ₹1,030, and ₹1,400 on earnings of ₹1,224.

Even as companies entice workers, the worker unions say they will go on strike in large numbers by logging out of their delivery apps and staying at home. The unions leading or participating in the protest include TGPWU, IFAT, the Gig & Platform Service Workers Union (Gipswu), and the Gig Workers Association (GigWA). In addition, TGPWU and Gipswu also penned a letter to Union Labour and Employment Minister Mansukh Mandaviya, listing their demands.



A gig worker stands outside a grocery store to pick up orders amid a strike call by unions on New Year's Eve, in Marine Lines, Mumbai PHOTO: PTI

## What unions want

- Discontinuation of 10-20-minute delivery mandates
- Fixing minimum per-km rates at ₹20
- Emergency leaves, comprehensive maternity protection
- Eliminating arbitrary ID blocking & punitive rating systems
- Guaranteeing minimum monthly earnings
- Abolishing peak hours, slot systems & weekend hour limits
- Capping all deductions at 20%
- Compensating workers for customer-initiated cancellations
- Extending 45-minute service-level agreement to 1 hr 30 mins
- Replacing AI-based calls with 24/7 human customer support
- Ending mandatory pre & post-task photo uploads
- Limiting women's assignments to 7-km radius

## Zomato's 2025 recap: Delhi-NCR tops order volumes, beats Mumbai

The national capital region (NCR) of Delhi emerged as the busiest market for Zomato in 2025. The region clocked over 42 million more orders than Mumbai and Bengaluru separately, according to the food delivery platform's year-end data.

UDISHA SRIVASTAV





### Delhi-NCR stands out
- **42.2 mn** more orders than Mumbai
- **42.3 mn** more orders than Bengaluru

### Busiest ordering minutes
- 8:25 PM: **1,872,000** orders
- 8:24 PM: **1,871,000** orders
- 8:22 PM: **1,869,000** orders

### BLINKIT TRENDS
**What India ordered**
- **10,516,879** kg *ghee*
- **3,388,145** *karelas*
- **8,813,019** shampoo bottles

### Orders in city
- Delhi-NCR: 407,360 **envelops (*lifafas*)**
- Noida: 317,072 **ice creams** post dinner

**International orders**



| UAE | USA | UK |
|---|---|---|
| 230,000 | 120,000 | 80,000 |

## DAZZLING SYDNEY FIREWORKS RING IN NEW YEAR



In Sydney, thousands thronged to the downtown waterfront on Wednesday to watch a dazzling fireworks show centred on the Sydney Harbour Bridge to welcome the New Year. But celebrations were held under the pall of its worst mass shooting at Bondi Beach in almost 30 years. Auckland was the first major city to ring in 2026 with a downtown fireworks display launched from New Zealand's tallest structure, Sky Tower. In Indonesia, cities scaled back New Year's Eve festivities as a gesture of solidarity with communities devastated by catastrophic floods and landslides PHOTO: REUTERS

## Consumers drive qcom sales on New Year's Eve

Consumers increasingly turned to quick commerce (qcom) and food delivery platforms on New Year's Eve (December 31), with sales volumes seeing a noticeable uptick as demand rose ahead of the celebrations despite the gig workers' strike.

Swiggy Cofounder Phani Kishan Addepalli said the search for grapes spiked throughout the day. "Today, Instamart saw 235,000 searches for grapes in the first half of the day, with searches starting as early as 5 am." In all, the searches for grapes on Instamart rose 78 times compared to usual days.

Not just on Instamart, Zepto also witnessed a sharp spike in grape purchases. The grapes were one of the top searched items as consumers followed a global ritual of eating 12 grapes at midnight, symbolising luck for each month of the year.

While Instamart had waived delivery, handling, and surge fees on orders above ₹199, Zepto removed all fees on orders exceeding ₹149.

On overall trends on qcom, Amitesh Jha, chief executive officer of Instamart, said that categories such as party supplies, gifting essentials, snacks and beverages, beauty, personal care, and grooming, and grapes saw high growth on the platform. UDISHA SRIVASTAV


**In fast or fragile markets, insight brings perspective.**

Decode market moves with sharp, fast, expert analysis — *every day* with **Stocks in the News** in Business Standard.

To book your copy, SMS **reachbs** to **57575** or email **order@bsmail.in**

Business Standard
Insight Out



**GUJARAT ENERGY TRANSMISSION CORPORATION LIMITED**
GETCO
Registered & Corporate Office, Sardar Patel Vidyut Bhavan, Racecourse, VADODARA - 390 007
www.getcogujarat.com & https:www.nprocure.com

**TENDER NOTICE NO. ACE (P&C): TN-20: 2025-26**

**[A] PROCUREMENT: E-3078:** - Purchase of under Frequency Panel for R&M works at Firm price basis.

**[B] CIVIL: ACE (P&C)/ CONTRACTS/ CIVIL -580:-** Construction of pile foundation for 66kV Kubadthal-Bhuvaldi line, 3 Nos Tower Type PS+0/+3/+6 Near. Village Zanu, Tal. Dascroi. Dist Ahmedabad under Nadiad Circle.

**[C] LINE: ACE (P&C)/ CONTRACTS/ E-382, 392, 396, 397, 400, 401, 405, 406, 411/ UPRATING/ TL/ UG/ 66kV/ 132kV/ S&E:-** (1) Supply, Erection, Testing & Commissioning of 132kV 2x(3+0)1Cx800sq.mm U/G cable laying 132kV LILO Chiloda from 132kV Ranasan Vijapur line.(From prop.AP 5/0(DD+3)cable termination tower to 132kV Chiloda SS(Ckt-1 &2-Route length-1.40Km) under KSY-II., (2) Supply, Installation, Testing & Commissioning for Conversion of (i) 66 kV Dhasa-Dahithara Line (ii) 66kV Damangar- Dahithara line (iii) 66kV Jesar – Khutavda line (iv) 66kV Otha - Dudhala 2 line (v) 66kV Dudhala 2 - Khutavda line (vi) 66kV Paliyad-Botad-1 Line (vii) 66 kV Paliyad-Hadadad Line (viii) 66 kV Paliyad-Turkha Line (ix) 66 kV Turkha-Sanali Line (x) 66kV Dhasa-Gadhali line & (xi) 66kV Gadhali-Gadhada line with DOG Conductor into equivalent HTLS Conductor (Equivalent weight of DOG Conductor with Higher Ampacity) of Amreli Circle., (3) Supply, erection, testing & commissioning of (i) 66kV S/C Line from 66kV Bapodar substation to 66kV Gosa substation and (ii) 66kV S/C line from 66kV Bapodar to 66kV Mahiyari Substation on turnkey Basis under Kisan Suryodaya Yojana (Phase-II)., (4) Supply, Erection, Testing & Commissioning of conversion of 66kV S/C H-frame line portion of existing 66kV Kotda – Lodhida – Hodathali – Sardhar line from Dog to Panther conductor on partly with D/C N.B. + M/C Panther tower with Panther conductor and partly with UGC 1Cx630 sq.mm (6+1) & (3+1) (OH Line length -16.442 KM under Gondal Circle. (Only OH Portion)., (5) Supply, Erection, Testing & Commissioning of 66kV D/C Dharampur - Ambatalat & 66kV D/C Dharampur – Barumal line on M/C tower with AL-59 (Weight equivalent to ACSR Panther) Conductor under Kisan Suryoday Yojna-II (Dharampur SS toAP-36) -7.745 kM - Pkg-1. under Navsari Circle. (Only OH Portion)., (6) Supply, installation, testing & commissioning of conversion of (i) 66 kV Jasdan - Sardhar line (ii) 66kV Jasdan - Kharchiya line (iii) 66kV Kharchiya - Mota Dadva line (iv) 66kV Mota Dadva - Ramod line (v) 66kV Jetpur - Umrali line with ACSR DOG conductor into equivalent HTLS conductor (equivalent weight of ACSR DOG conductor with higher ampacity) of Gondal Circle., (7) Supply, Erection, Testing & Commissioning of 66kV S/C line on D/C panther tower from 66kV Kidiyanagar substation to M/s Executive Engineer Water resource investigation division, for unit PS-1 for catering 9350 KVA new power demand at 66kV voltage class Package-1: from 66kV Kidiyanagar Gantry to AP-31/0 having line length 9.24Rkm (OH-09.09Rkm + UG-0.15Rkm) (630Sqmm (3+1)) under Anjar Circle. (Only OH Portion)., (8) Supply, Erection, Testing & Commissioning of 66kV S/C line on D/C panther tower from 66kV Kidiyanagar substation to M/s Executive Engineer Water resource investigation division, for unit PS-1 for catering 9350 KVA new power demand at 66kV voltage class Package–2: from AP-31/0 to AP-45/0 having line length 9.036Rkm under Anjar Circle. (Only OH Portion)., (9) Supply, Erection, Testing & Commissioning of 66kV S/C line on D/C panther tower from 66kV Kidiyanagar substation to M/s Executive Engineer Water resource investigation division, for unit PS-1 for catering 9350 KVA new power demand at 66kV voltage class Package–3: AP-45/0 to AP-65/0 having line length 9.98 km (9.83km OH + 0.15km UG cable) under Anjar Circle. (Only OH Portion).

**[D] SUBSTATION: ACE (P&C)/ CONTRACTS/ E-407, 410:-** (1) Supply, Laying, Erection, Testing and Commissioning of 132kV 1Cx800sq mm 2*(3+0) XLPE U/G cable from 220 kV Godhra S/S to 132 kV Godhra TSS (cable route length 8.510 RKms)., (2) Design, Engineering, Manufacturing, Supply, Erection, Testing & Commissioning of 66/11kV GIS equipments, materials on turnkey basis including all civil works at 66kV Morbi Jail Road GIS.

Above tenders are available on website **www.getcogujarat.com** (for view and download only) & **tender.nprocure.com** (For view, download and online tender submissions).

**Note:** The bidders are requested to be in touch with our website till opening of these tenders.

**Date: 01/01/2026** **Additional Chief Engineer (Procurement & Contracts)**



https://bankofbaroda.bank.in
बैंक ऑफ़ बड़ौदा
Bank of Baroda
India's International Bank

**TENDER NOTICE**

Bank of Baroda, Information Security Department, Mumbai invites bids for Supply, Installation and Implementation of Threat Intelligence Platform through GeM portal.

Details are available under Tenders Section of Bank's website https://bankofbaroda.bank.in

Any Addendum/Corrigendum including modification in the bid shall be notified only on Bank's official website. Bidders should refer the same before submission of their Bids.

**GeM Bid Reference No.: GEM/2025/B/7056220**

**Last date of submission of online bids: 28-Jan-2026 up to 15:00 hrs. IST.**

**Place: Mumbai**
**Date: 01-Jan-2026**

**Group Chief Information Security Officer**

137/25-26



**GEECEE VENTURES LIMITED**
**CIN: L24249MH1984PLC032170;**
**Regd. Office: 209-210, Arcadia Building, 2nd Floor, 195, Nariman point, Mumbai- 400 021.Tel. No. 91-22-4019 8600.**
**Fax No. 91-22-4019 8650; Email:** geecee.investor@gcvl.in
**Website:** www.geeceeventures.com

**NOTICE OF SPECIAL WINDOW FOR RE-LODGEMENT OF TRANSFER REQUESTS OF PHYSICAL SHARES OF GEECEE VENTURES LIMITED**

Pursuant to **SEBI no. SEBI/HO/MIRSD/MIRSD-PoD/P/CIR/2025/97** dated July 02, 2025, all the shareholders of the company are hereby informed that a Special Window has been opened for a period of six months from July 07, 2025 till January 06, 2026 to facilitate the re-lodgement of transfer requests of physical shares.

**This facility is available only for re-lodgement of transfer deeds lodged prior to April 01, 2019 and which were rejected/returned/not attended due to deficiency in the documents/process/or otherwise.**

Investors who have missed the earlier deadline are encouraged to take advantage of this opportunity by furnishing the necessary documents to the Company's Registrar and Share Transfer Agent i.e MUFG Intime India Private Limited (formerly known as Link Intime India Private Limited) at C-101, Embassy 247, LBS. Marg, Vikhroli (West), Mumbai-400083, Tel No.: +918108116767, email: investor.helpdesk@in.mpms.mufg.com within stipulated time.

The Company's website www.geeceeventures.com, has been updated with the circular detailing the opening of this special window.

**For GeeCee Ventures Limited**
**Sd/-**
**Ms. Darshana Jain**
**Company Secretary and Compliance Officer**

**Place : Mumbai**
**Dated : January 01,2026**



**E.I.D.- PARRY (INDIA) LIMITED**
CIN: L24211TN1975PLC006989
Regd. Office: 'Dare House', Parrys Corner, Chennai-600 001
Tel: 044-25306789
Web: www.eidparry.com, Email: investorservices@parry.murugappa.com

**NOTICE TO SHAREHOLDERS**

**SPECIAL WINDOW FOR RE-LODGEMENT OF TRANSFER REQUESTS OF PHYSICAL SHARES**

Pursuant to SEBI Circular No. SEBI/HO/MIRSD/MIRSDPoD/P/CIR/2025/97 dated July 2, 2025, a special window has been opened for a period of six months from **July 7, 2025 to January 6, 2026**, to facilitate re-lodgement of transfer requests of physical shares.

This facility is only available for transfer deeds lodged prior to April 1, 2019 and which were rejected, returned or not attended due to deficiencies in documents/ process/ otherwise. The securities that are re-lodged for transfer will be processed only in demat mode. Eligible shareholders may avail this opportunity by furnishing the necessary documents to the Company's Registrar and Share Transfer Agent (RTA) viz., KFin Technologies Limited, (Unit: E.I.D.- Parry (India) Limited), Selenium Tower B, Plot 31 & 32, Gachibowli, Financial District, Nanakramguda, Hyderabad - 500 032, Toll Free No.1800-309-4001 or email to **einward.ris@kfintech.com** on or before **January 6, 2026,** the timeline prescribed by SEBI. No re-lodgement will be accepted after **January 6, 2026.**

**For E.I.D.- Parry (India) Limited**

**Place : Chennai**
**Date : December 31, 2025**

**Biswa Mohan Rath**
**Company Secretary**






Business Standard
Insight Out

businessstandard  bsindia  business.standard  business-standard.com

## देश - विदेश

# जर्मनीत थरारक बँकफोड! पार्किंगच्या भिंतीला भगदाड पाडून २९० कोटींचा डल्ला

**नवी दिल्ली, दि. ३१ (वृत्तसंस्था) :** जर्मनीतील गेल्सेंकिर्चेन शहरात एका थरारक बँकफोडीने खळबळ उडवून दिली आहे. येथील स्पार्कस बँकेतून चोरट्यांनी तब्बल २९० कोटी रुपयांची चोरी करत थेट हॉलिवूड चित्रपटाची आठवण करून देणारा प्रकार केला. बँकेच्या पार्किंग गॅरेजच्या भिंतीला मोठे छिद्र पाडत चोर तिजोरीपर्यंत पोहोचले आणि एकूण ३,२५० हून अधिक सेफ डिपॉझिट लॉकर फोडून त्यातील रोकड व मौल्यवान दागिने लंपास केले. पोलिसांच्या माहितीनुसार, ही चोरी ख्रिसमसच्या सुट्ट्यांदरम्यान करण्यात आली. या काळात बहुतांश दुकाने आणि कार्यालये बंद असल्याने परिसरात वर्दळ कमी होती. त्यामुळे कोणालाही संशय येऊ नये, यासाठीच गुन्हेगारांनी सुट्ट्यांचा काळ निवडल्याचे मानले जात आहे. या चोरीचा उलगडा २९ डिसेंबरच्या सकाळी झाला, जेव्हा बँकेचा फायर अलार्म वाजला. घटनास्थळी पोहोचलेल्या पोलिसांना आणि बँक अधिकाऱ्यांना पार्किंगमधून थेट तिजोरीकडे जाणारे भिंतीतील मोठे भगदाड दिसून आले. तपासात हे काम शक्तिशाली ड्रिल मशीनच्या साहाय्याने करण्यात आल्याचे स्पष्ट झाले. दरम्यान, बँकेच्या आसपास राहणाऱ्या काही नागरिकांनी शनिवार रात्रीपासून रविवार सकाळपर्यंत मुखवटे घातलेले काही लोक मोठ्या पिशव्या घेऊन ये-जा करताना पाहिल्याचे पोलिसांना सांगितले आहे. सीसीटीव्ही फुटेजमध्ये काळ्या रंगाची ऑडी RS6 कारही आढळून आली असून, त्याच वाहनातून चोर पसार झाल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. पोलिसांनी या संपूर्ण घटनेची तुलना थेट 'ओशन इलेव्हन' या प्रसिद्ध हॉलिवूड चित्रपटाशी केली आहे. अधिकाऱ्यांच्या मते, इतक्या मोठ्या प्रमाणावर आणि अत्यंत नियोजनबद्ध पद्धतीने केलेली चोरी अनेक दिवसांच्या तयारीशिवाय अशक्य आहे. दरम्यान, स्पार्कस बँकेने आपल्या ग्राहकांना दिलासा देत बँक त्यांच्या पाठीशी ठामपणे उभी असल्याचे स्पष्ट केले आहे. ग्राहकांना पूर्ण सहकार्य दिले जाईल, असे सांगत पोलिस लवकरच या धाडसी चोरीमागील गुन्हेगारांना पकडतील, अशी आशा बँकेकडून व्यक्त करण्यात आली आहे.


# माचू पिचूकडे जाणाऱ्या मार्गावर भीषण अपघात; पेरूमध्ये दोन पर्यटक रेल्वेंची धडक, १ ठार तर ३० जखमी

**नवी दिल्ली, दि. ३१ (वृत्तसंस्था) :** पेरूमधील जगप्रसिद्ध ऐतिहासिक स्थळ माचू पिचूकडे जाणाऱ्या मार्गावर मंगळवारी दोन पर्यटक रेल्वेगाड्यांची जोरदार धडक झाली. या अपघातात एका व्यक्तीचा मृत्यू झाला असून सुमारे ३० प्रवासी जखमी झाले आहेत. पोलिसांच्या माहितीनुसार, मृत व्यक्ती रेल्वे विभागातील कर्मचारी होता.अपघातानंतर माचू पिचू आणि कुज्को शहराला जोडणारी रेल्वे सेवा तात्काळ तात्पुरती बंद करण्यात आली. रेल्वेचे संचालन करणाऱ्या कंपनीने दिलेल्या माहितीनुसार, दुपारच्या सुमारास माचू पिचूहून परतणाऱ्या एका ट्रेनची समोरून येणाऱ्या दुसऱ्या पर्यटक ट्रेनशी टक्कर झाली. हा अपघात कोरीवायराचिना परिसरात घडला. अपघाताचे नेमके कारण अद्याप स्पष्ट झालेले नाही. मात्र, स्थानिक माध्यमांमध्ये समोर आलेल्या छायाचित्रे आणि व्हिडिओंमध्ये दोन्ही गाड्या जंगल आणि मोठ्या खडकांमधून जाणाऱ्या अरुंद रेल्वे मार्गावर अडकलेल्या दिसत आहेत. इंजिनचा पुढील भाग मोठ्या प्रमाणात चिरडलेला असून खिडक्या फुटलेल्या आणि संरचनेचे गंभीर नुकसान झाल्याचे स्पष्ट दिसते. दरवर्षी सुमारे १५ लाख पर्यटक माचू पिचूला भेट देतात. बहुतेक पर्यटक ट्रेनने आगुआस कॅलियंटेस या शहरात पोहोचतात. १५ व्या शतकात इंका संस्कृतीने उभारलेले हे ऐतिहासिक स्थळ अचूक दगडी बांधकामासाठी जगभरात प्रसिद्ध आहे. गेल्या दशकात येथे येणाऱ्या पर्यटकांच्या संख्येत सुमारे २५ टक्क्यांनी वाढ झाली आहे. मात्र, पेरूमधील राजकीय अस्थिरता आणि माचू पिचूच्या व्यवस्थापनावरून झालेल्या वादांचा पर्यटनावर परिणाम होत आहे. अनेक वेळा आंदोलकांनी माचू पिचूकडे जाणाऱ्या रेल्वे लाईनवर अडथळे निर्माण केले आहेत. रेल्वेव्यतिरिक्त पर्यटक ओल्यांटायटॅम्बो येथून चार दिवसांचा पायी ट्रेक करत माचू पिचूपर्यंत पोहोचतात. दरम्यान, भारत आणि माजी बांगलादेशी पंतप्रधान शेख हसीना यांचे विरोधक असलेल्या नेते उस्मान हादी यांच्या हत्येप्रकरणात नवा ट्विस्ट समोर आला आहे. या प्रकरणातील मुख्य आरोपी फैसल करीम मसूदने आपल्यावर लावलेले सर्व आरोप फेटाळले आहेत. मसूदने एक व्हिडिओ जारी करत आपण दुबईमध्ये असल्याचा दावा केला असून हादी यांच्या हत्येमागे आपला नव्हे, तर एखाद्या राजकीय संघटनेचा हात असल्याचे म्हटले आहे. मात्र, या व्हिडिओची अद्याप अधिकृत पुष्टी झालेली नाही. व्हिडिओमध्ये मसूद म्हणतो की, तो बांगलादेशी नाही आणि त्याला व त्याच्या कुटुंबाला विनाकारण गोवले जात आहे. उस्मान हादी जमातीशी संबंधित असल्याने त्यांच्या मृत्यूमागे जमातींच्या अंतर्गत वादाचा हात असू शकतो, असा दावाही त्याने केला आहे.

# ढाक्यात राजनैतिक क्षण: जयशंकर आणि पाकिस्तानी संसदेच्या अध्यक्षांचे हस्तांदोलन; ऑपरेशन सिंदूरनंतर पहिलीच भेट

**नवी दिल्ली, दि. ३१ (वृत्तसंस्था) :** भारताचे परराष्ट्र मंत्री डॉ. एस. जयशंकर यांनी ढाका येथे पाकिस्तानी संसदेचे अध्यक्ष अयाज सादिक यांची भेट घेतली. या भेटीदरम्यान दोन्ही नेत्यांनी हस्तांदोलन केले. बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खालिदा झिया यांच्या अंत्यसंस्कारासाठी दोघेही ढाक्यात उपस्थित होते. मे महिन्यात भारत-पाकिस्तानदरम्यान झालेल्या 'ऑपरेशन सिंदूर'नंतर दोन्ही देशांतील वरिष्ठ नेत्यांची समोरासमोर भेट होऊन हस्तांदोलन झाल्याची ही पहिलीच घटना आहे. त्यामुळे या भेटीकडे राजनैतिक पातळीवर विशेष महत्त्व दिले जात आहे. याआधी भारत-पाकिस्तान संबंधांतील तणावामुळे अनेक प्रसंग चर्चेत आले होते. आशिया कप क्रिकेट स्पर्धेदरम्यान भारतीय संघाने पाकिस्तानी खेळाडूंशी हस्तांदोलन करण्यास नकार दिला होता, ज्यामुळे मोठा वाद निर्माण झाला. इतकेच नव्हे, तर मालिका जिंकल्यानंतर भारतीय संघाने आशियाई क्रिकेट परिषदेचे प्रमुख मोहसिन नकवी यांच्याकडून ट्रॉफी स्वीकारण्यासही नकार दिला होता. मोहसिन नकवी हे पाकिस्तान क्रिकेट बोर्डाचे प्रमुख असून पाकिस्तान सरकारमध्येही मंत्री आहेत. दरम्यान, बांगलादेशच्या माजी पंतप्रधान खालिदा झिया यांचे आज सायंकाळी पाच वाजता दफन करण्यात आले. ढाक्यातील संसद परिसरातील झिया उद्यानात त्यांचे पती आणि बांगलादेशचे माजी राष्ट्रपती झियाउर रहमान यांच्या कबरीजवळ त्यांना अंतिम निरोप देण्यात आला. त्यांच्या अंत्ययात्रेत देशभरातून सुमारे १० लाख लोक सहभागी झाल्याचे सांगितले जाते. खालिदा झिया यांचे मंगळवारी सकाळी ८० वर्षांच्या वयात निधन झाले. गेल्या सुमारे २० दिवसांपासून त्या रुग्णालयात व्हेंटिलेटरवर उपचार घेत होत्या. त्यांच्या निधनानंतर बांगलादेश सरकारने तीन दिवसांचा राष्ट्रीय शोक जाहीर केला आहे. या काळात सर्व सरकारी इमारतींवर राष्ट्रीय ध्वज अर्ध्यावर फडकावला जाणार असून सर्व शासकीय कार्यक्रम स्थगित ठेवण्यात येणार आहेत.

# व्होडाफोन-आयडियाला केंद्राचा मोठा दिलासा; ८७,६९५ कोटींची थकबाकी आता २०४१ पर्यंत फेडता येणार!



**नवी दिल्ली, दि. ३१ (वृत्तसंस्था) :** भारतीय दूरसंचार क्षेत्रातील महत्त्वाची कंपनी असलेल्या व्होडाफोन-आयडियाला केंद्र सरकारने मोठा दिलासा दिला आहे. दूरसंचार क्षेत्रातील निरोगी स्पर्धा टिकवून ठेवण्यासाठी आणि ग्राहकांचे हित जपण्यासाठी केंद्रीय मंत्रिमंडळाने कंपनीच्या ८७,६९५ कोटी रुपयांच्या 'एजीआर' थकबाकीच्या फेररचनेला मंजुरी दिली आहे.

३१ डिसेंबर २०२५ पर्यंतची ही थकीत रक्कम आता २०३१-३२ ते २०४०-४१ या दहा वर्षांच्या कालावधीत टप्प्याटप्प्याने भरण्याची मुभा कंपनीला देण्यात आली आहे. हा निर्णय सर्वोच्च न्यायालयाने ऑक्टोबर आणि नोव्हेंबर २०२५ मध्ये दिलेल्या निर्देशांनंतर घेण्यात आला आहे. न्यायालयाने या प्रकरणातील जनहित आणि सरकारचा व्होडाफोन-आयडियामधील मोठा हिस्सा लक्षात घेऊन धोरणात्मक निर्णय घेण्याचे अधिकार सरकारला दिले होते. एका वरिष्ठ सरकारी अधिकाऱ्याने स्पष्ट केले की, दूरसंचार क्षेत्रात किमान तीन मोठ्या कंपन्या असणे ग्राहकांसाठी आणि स्पर्धात्मक दरांसाठी आवश्यक आहे. त्यामुळे हा निर्णय केवळ एका कंपनीला मदत करण्यासाठी नसून संपूर्ण क्षेत्राच्या प्रकृतीसाठी घेण्यात आला आहे. दूरसंचार विभाग आता या गोठवलेल्या थकबाकीचे ऑडिट रिपोर्टच्या आधारे पुनर्मूल्यांकन करेल आणि नियुक्त केलेली समिती जो निर्णय घेईल, तो उभय पक्षांवर बंधनकारक असेल. दरम्यान, २०१७-१८ आणि २०१८-१९ या आर्थिक वर्षातील थकीत रक्कम पूर्वी ठरल्याप्रमाणे २०२५ ते २०३१ या काळात कंपनीला भरावी लागणार आहे. सध्या व्होडाफोन-आयडिया ५जी सेवा सुरू करण्यासाठी आणि नेटवर्क विस्तारण्यासाठी निधी उभा करण्याच्या प्रयत्नात असून, सरकारच्या या निर्णयामुळे कंपनीला मोठी आर्थिक उभारी मिळणार आहे.

# वर्षअखेरीस बाजारात मोठी झेप! गुंतवणूकदारांना ४ लाख कोटींचा फायदा; मेटल आणि रिलायन्स शेअर्सची चमक

**नवी दिल्ली, दि. ३१ (वृत्तसंस्था) :** भारतीय शेअर बाजाराने २०२५ या वर्षाचा शेवट जोरदार तेजीने केला असून वर्षाच्या अखेरच्या व्यवहार दिवशी गुंतवणूकदारांसाठी हा दिवस 'सोन्याहून पिवळा' ठरला. चौफेर खरेदीमुळे सेन्सेक्स आणि निफ्टी दोन्ही निर्देशांकांनी दमदार उसळी घेतली. मुंबई शेअर बाजाराचा सेन्सेक्स ५४५ अंकांनी वाढून ८५,२२० वर बंद झाला, तर निफ्टी १९० अंकांची वाढ नोंदवत २६,१२९ या स्तरावर स्थिरावला. या एका दिवसातील तेजीमुळे गुंतवणूकदारांच्या संपत्तीत जवळपास ४ लाख कोटी रुपयांची भर पडली.



या तेजीचा थेट परिणाम बाजार भांडवलावरही दिसून आला. बीएसईवर सूचीबद्ध कंपन्यांचे एकूण बाजार भांडवल ४७१.७२ लाख कोटी रुपयांवरून वाढून ४७५.७० लाख कोटी रुपयांवर पोहोचले. म्हणजेच सरत्या वर्षाच्या शेवटच्या दिवशीच गुंतवणूकदारांनी सुमारे ३.९८ लाख कोटी रुपयांची कमाई केली.

बाजारातील या उत्साहामागे काही ठळक कारणे ठरली. केंद्र सरकारने स्टील आयातीवर 'सेफगार्ड ड्युटी' लागू केल्याच्या वृत्तामुळे स्टील आणि मेटल कंपन्यांच्या शेअर्समध्ये जोरदार खरेदी झाली. त्याचबरोबर जागतिक बाजारात कच्च्या तेलाच्या दरात झालेली घसरण भारतीय बाजारासाठी सकारात्मक ठरली. गेल्या काही दिवसांच्या घसरणीनंतर अनेक दर्जेदार शेअर्स आकर्षक किमतीत उपलब्ध झाल्याने गुंतवणूकदारांनी खालच्या स्तरावर मोठ्या प्रमाणात व्हॅल्यू बायिंग केली.

क्षेत्रीय निर्देशांकांकडे पाहिले असता आयटी आणि टेलिकॉम वगळता जवळपास सर्वच क्षेत्रांमध्ये तेजी दिसून आली. ऑईल अँड गॅस, ऊर्जा आणि मेटल शेअर्स सर्वाधिक चमकले. पीएसयू बँका, ऑटो आणि कंझ्युमर ड्युरेबल्स क्षेत्रातील निर्देशांकांमध्येही १ टक्क्यांहून अधिक वाढ नोंदवली गेली.

सेन्सेक्समधील शेअर्समध्ये टाटा स्टीलने सर्वाधिक २.४५ टक्क्यांची वाढ दाखवली. कोटक महिंद्रा बँक, रिलायन्स इंडस्ट्रीज, ॲक्सिस बँक आणि टायटन हे शेअर्सही मजबूत तेजीचे केंद्र ठरले. दुसरीकडे आयटी क्षेत्रातील दबाव कायम राहिल्याने टीसीएसमध्ये सर्वाधिक २.१० टक्क्यांची घसरण झाली. टेक महिंद्रा, इन्फोसिस, बजाज फायनान्स आणि सन फार्मा हे शेअर्सही किरकोळ घसरणीसह बंद झाले.

# मोदी सरकारच्या डिव्हिडंड उत्पन्नात पाच वर्षात ८६ टक्के वाढ

**नवी दिल्ली, दि. ३१ (वृत्तसंस्था) :** सरकारच्या मालकीच्या केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांकडून (सीपीएसई) केंद्राला मिळणाऱ्या लाभांश उत्पन्नांत सातत्यपूर्ण आणि लक्षणीय वाढ सुरू असून, मागील पाच आर्थिक वर्षांत ते अर्थसंकल्पातील सुधारित अंदाजापेक्षा सरस राहत, तब्बल ८६ टक्क्यांनी वाढले, असे अर्थमंत्रालयाने बुधवारी निवेदनाद्वारे स्पष्ट केले.

सरकारी मालकीच्या कंपन्यांमधील अलीकडील लाभांश वितरणाचा कल हा वाढलेल्या सरकारी देखरेखीला अधोरेखित करतो. हा लाभांश सरकारच्या तिजोरीसाठी करोतर महसूलाचा एक महत्त्वपूर्ण स्रोत आहे. अलीकडे तर सुधारित भांडवल व्यवस्थापन, मजबूत आर्थिक कामगिरी यामुळे सार्वजनिक क्षेत्रातील बँकांकडून केंद्र सरकारला लाभांशरूपाने चांगला महसूल मिळविता आला आहे.

अर्थमंत्रालयाने जारी केलेल्या आकडेवारीनुसार, २०२०-२१ मध्ये प्रत्यक्ष लाभांश संकलन ३९,७५० कोटी रुपये होते, जे ३४,७१७ कोटी रुपयांच्या सुधारित अंदाजापेक्षा जास्त होते. जरी या काळात सरकारने निर्गुंतवणुकीद्वारे अनेक सरकारी मालकीच्या कंपन्यांमधील आपला भागभांडवली हिस्सा कमी करून लाभांश उत्पन्नांत भरभराट सुरू राहिली. २०२१-२२ मध्ये, लाभांश प्राप्ती एकूण ४६,००० कोटी रुपये होती. करोना साथीसारखे संकट तसेच जागतिक आणि देशांतर्गत आव्हानात्मक आर्थिक परिस्थितीनेही लाभांशाचा मजबूत प्रवाह अबाधित राहिला.

त्यानंतर, २०२२-२३ मध्ये लक्षणीय बळकटी मिळत प्रत्यक्ष लाभांश प्राप्ती ५९,५३३ कोटी रुपयांपर्यंत वाढली, जी ४३,००० कोटी रुपयांच्या सुधारित अंदाजापेक्षा खूप जास्त होती. २०२३-२४ मध्येही वाढीची गती कायम राहिली आणि सरकारने लाभांशरूपाने ६४,००० कोटी रुपये कमावले, जे ५०,००० कोटी रुपयांच्या सुधारित उद्दिष्टापेक्षा जास्त होता. सर्वात मोठी वाढ २०२४-२५ मध्ये नोंदवली गेली आणि लाभांश प्राप्ती ७४,०१७ कोटी रुपयांपर्यंत वाढली.

पाच वर्षांतील सीपीएसईकडून २०२४-२५ मध्ये मिळालेली सर्वाधिक लाभांश रक्कम ही सरकारी कंपन्यांच्या प्रशासन, उत्तरदायित्व आणि आर्थिक कामगिरीतील सातत्यपूर्णतेला अधोरेखित केले. लाभांश कामगिरीतील सातत्यपूर्ण सुधारणा, यशस्वी बाजार-आधारित निर्गुंतवणूक आणि लक्ष्यित क्षमता विकास याद्वारे, २०२५ मधील 'दीपम'च्या उपक्रमांनी वित्तीय बळकटी वाढवली, गुंतवणूकदारांचा आत्मविश्वास वाढवला आणि केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांमध्ये दीर्घकालीन मूल्य निर्मितीला चालना दिली, असे अर्थमंत्रालयाच्या निवेदनात म्हटले आहे.

लाभांश उत्पन्नाव्यतिरिक्त, 'दीपम' विभागाने केंद्रीय सार्वजनिक क्षेत्रातील उपक्रमांतील सरकारच्या भागभांडवलाच्या खुल्या बाजारात विक्री आणि मूल्य निर्माण करण्यासाठी 'ऑफर फॉर सेल' (ओएफएस) मार्गाचाही वापर केला. या माध्यमातून सरकारच्या कर-व्यतिरिक्त महसुलाचा एक महत्त्वाचा स्रोत म्हणून लक्षणीय भूमिका बजावली आहे.

# वॉरेन बफेट यांचा ऐतिहासिक निरोप: ६० वर्षांच्या नेतृत्वाचा शेवट

**नवी दिल्ली, दि. ३१ (वृत्तसंस्था) :** जगातील महान गुंतवणूकदार वॉरेन बफेट आज, ३१ डिसेंबर रोजी, बर्कशायर हॅथवेच्या मुख्य कार्यकारी अधिकारीपदावरून पायउतार होत आहेत. ९५ वर्षांचे बफेट यांचा तब्बल सहा दशकांचा हा प्रवास केवळ आर्थिक यशाचा नाही, तर निर्णय, चुका आणि त्यातून मिळालेल्या शिकवणींचीही विलक्षण कहाणी आहे. ज्या बर्कशायर हॅथवेच्या जोरावर ते जगातील नवव्या क्रमांकाचे श्रीमंत व्यक्ती बनले, त्याच कंपनीची खरेदी त्यांनी आयुष्यातील 'सर्वात मोठी चूक' असल्याचे अनेकदा सांगितले आहे. विशेष म्हणजे, बफेट यांनी ही कंपनी कोणत्याही रणनीतीनुसार किंवा व्यावसायिक करारातून नव्हे, तर रागाच्या भरात विकत घेतली होती. निवृत्तीबद्दल बोलताना बफेट स्पष्ट शब्दांत सांगतात की, निवृत्तीचा विचारसुद्धा त्यांना मान्य नाही. "निवृत्ती माझ्यासाठी मृत्यूपेक्षाही वाईट असेल," असे ते म्हणाले होते. आजही ते आठवड्यातून पाच दिवस ओमाहा येथील बर्कशायरच्या मुख्यालयात नियमितपणे जातात.

'द वॉल स्ट्रीट जर्नल'शी बोलताना बफेट यांनी आपल्या खास विनोदी शैलीत सांगितले की, ते घरी बसून टीव्हीवरील सोप ओपेरा पाहणार नाहीत. आपली आवड आजही पूर्वीसारखीच असल्याचे सांगत त्यांनी स्पष्ट केले की, ते चेअरमन म्हणून कंपनीजवळच राहतील आणि नवे सीईओ ग्रेग एबल यांना जेवढी मदत करता येईल, तेवढी नक्कीच करतील. १९६५ साली जेव्हा वॉरेन बफेट यांनी बर्कशायर हॅथवेचा ताबा घेतला, तेव्हा ती एक अडचणीत सापडलेली टेक्सटाईल कंपनी होती. त्या काळात अनेकांनी या निर्णयाकडे संशयाने पाहिले.


### सार्वजनिक सूचना

श्रीमती तबस्सुम मजहर अन्सारी यांच्या नावे त्यांचे हक्काचे मालकी हक्क, शेअर्स आणि हितसंबंध भेट म्हणून दिले आहेत ही फ्लॅट क्रमांक २०, पहिल्या मजल्यावर, बी- विंगवर, सुमारे ५६० चौरस फूट (कार्पेट क्षेत्रफळ) आहे ही इमारत भावना को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड म्हणून ओळखली जाते ही इमारत प्लॉट क्रमांक ६, गोशाळा रोड, मुलुंड (पश्चिम), मुंबई-४०० ०८० वर बांधण्यात आली आहे. ही इमारत महाराष्ट्र सहकारी संस्था कायद्यांतर्गत नोंदणीकृत आहे व ही इमारत भावना को-ऑपरेटिव्ह हाऊसिंग सोसायटी लिमिटेड म्हणून ओळखली जाते जी महाराष्ट्र को-ऑप. सोसायटीज ॲक्ट, १९६० अंतर्गत क्र. बीओएम/डब्ल्यूटी/एचएसजी/टीसी/८७०३ अंतर्गत २००१-२००२ दि. १६-०१-२००१ अंतर्गत, शेअर सर्टिफिकेट क्रमांक ०२०, सदस्य नोंदणी क्रमांक २० देखील धारण करतो, ज्यामध्ये शेअर क्रमांक ९६ ते १०० रुपये प्रत्येकी ५०/- रुपयांचा समावेश आहे. कु. रेजिना जोसेफिन फर्नांडिस यांनी २७/१२/२०२५ रोजी एमयूएम-२८-२५०१७-२०२५ येथे मृत्युपत्र केले. येथे अटी आणि शर्ती गोपनीय आहेत. सदर मालमत्ता सर्व भार आणि शुल्कांपासून मुक्त आहे आणि सदर मालमत्तेवर गहाण ठेवून किंवा शुल्क निर्माण करून त्यांनी कोणतेही कर्ज/वित्त मिळवलेले नाही आणि सदर मालमत्तेवरील त्यांचे हक्क स्पष्ट आणि विक्रीयोग्य आहेत.

आमचा क्लायंट याद्वारे फ्लॅट क्रमांक बी/२० च्या संदर्भात कोणत्याही कागदपत्र, विक्री, करार, समजुती, भेटवस्तू, गहाणखत, धारणाधिकार, शुल्क, ट्रस्ट, वारसा, सुविधा किंवा अन्यथा कोणत्याही प्रकारे किंवा वरील मालमत्तेच्या मालकीविरुद्ध कोणताही आक्षेप असलेल्या कोणत्याही व्यक्तींकडून दावे मागवत आहे. दावेदाराने या सूचना प्रकाशित झाल्यापासून १४ दिवसांच्या आत त्याच्या/तिच्या दाव्याच्या पुराव्यांसह त्याचा/तिचा दावा लेखी स्वरूपात अधोस्वाक्षरीकाराला कळवणे आवश्यक आहे. जर कोणतेही दावे किंवा आक्षेप १४ दिवसांच्या आत प्राप्त झाले नाहीत तर असे गृहीत धरले जाईल की असा कोणताही दावा अस्तित्वात नाही, आमचा क्लायंट व्यवहार अंतिम करेल किंवा त्यानंतर प्राप्त झालेले दावे किंवा आक्षेप विचारात घेतले जाणार नाहीत.

ठिकाण : मुंबई
तारीख : ०१-०१-२०२६

वकील श्री. जे. एस. सिंह
दिनकर कॉटेज, जे.एन. रोड, मुलुंड पश्चिम मुंबई - ४०००८०

### जाहिर नोटीस

या जाहिर नोटीसीद्वारे तमाम लोकांस कळविण्यांत येते की, **गॉव मौजे दिवाणमान, वसई रोड (प), ता. वसई, जि. पालघर,** येथिल सर्वे नं. ३६, प्लॉट नं. २९, **सदनिका क्र. बी/२०१, दुसरा माळा, क्षेत्र ३७० चौ. फुट.** बिल्ट अप **पुर्वा कॉम्पलेक्स को. ऑप. हौ. सो. लि.** सदर सदनिका **श्रीमती. विद्या जी. धमेजा** यांची मालकीची होती, त्यांनी सदरहू सदनिका **मे. पुर्वा कंस्ट्रक्शनस** ह्यांचे कडून १९८० साली कराराने विकत घेतलेले होते व आहे. **श्रीमती. विद्या जी. धमेजा** हि **दि. ०८/०७/२००८** रोजी मयत झाली असून त्यांना कायदेशीर वारस म्हणून **१). श्री. रमेश जी. धमेजा (मुलगा) २). श्री. हरेश जी. धमेजा (मुलगा)** त्यांच्या मृत्युच्या वेळी उत्तराधिकारी करणारे वारस म्हणून **श्री. हरेश जी. धमेजा** हे कोणत्याही व्यक्ति बरोबर सदनिकेची विक्रीच्या व्यवहार करु शकतात कोणाही व्यक्ति व संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, वारसा हक्क द्वारे उक्त सदनिकेवर किंवा त्यावर कोणताही दावा अथवा हितसंबध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्व झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत सर्व त्या लेखी कागदोपत्री पुराव्यासहित माझे ऑफिस नं. ०२, वसंत को. ऑप. हौ. सो. लि. मौजे दिवाणमान, विशाल नगर, वसई रोड (प.), ता. वसई, जि. पालघर, (मोबाईल नंबर :- ९८९०५३३९६१) येथे सादर करावीत, अन्यथा तसा कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क वा अधिकार नाही व असल्यास तो सोडून देण्यात आलेला आहे असे समजून सदरहू सदनिकेची विक्रीच्या व्यवहार कोणाही व्यक्ति बरोबर पूर्ण करण्यात येईल, यांची सर्व संबधितानी नोंद घ्यावी.

**(अनिल एम. राजभर)**
दिनांक : ०१/०१/२०२६ **वकिल.**

### जीसी व्हेंचर्स लिमिटेड

GEECEE

**सीआयएन : L24249MH1984PLC032170**
**नोंदणीकृत कार्यालय : २०९-२१०, आर्केडिया बिल्डिंग, दुसरा मजला, १९५, नरिमन पॉइंट, मुंबई - ४०० ०२१. दूरध्वनी क्रमांक ९१-२२-४०१९ ८६००.**
**फॅक्स क्रमांक ९१-२२-४०१९ ८६५०; ईमेल:** geecee.investor@gcvl.in
**वेबसाइट :** www.geeceeventures.com

**जीसी व्हेंचर्स लिमिटेडच्या भौतिक शेअर्सच्या हस्तांतरण विनंत्या पुन्हा दाखल करण्यासाठी विशेष विंडोची सूचना**

०२ जुलै २०२५ च्या सेबी परिपत्रक क्रमांक **सेबी/एचओ/एमआयआरएसडी/एमआयआरएसडी-पीओडी/पी/सीआयआर/२०२५/९७** नुसार, कंपनीच्या सर्व भागधारकांना येथे कळविण्यात येते की, भौतिक शेअर्सच्या हस्तांतरण विनंत्या पुन्हा दाखल करण्यासाठी ७ जुलै २०२५ ते ६ जानेवारी २०२६ या सहा महिन्यांच्या कालावधीसाठी एक विशेष खिडकी उघडण्यात आली आहे.

**ही सुविधा फक्त १ एप्रिल २०१९ पूर्वी दाखल केलेल्या आणि कागदपत्रांमध्ये/प्रक्रियेत/किंवा इतर कारणांमुळे नाकारण्यात आलेल्या/परत करण्यात आलेल्या/उपस्थित न झालेल्या हस्तांतरण करारांच्या पुनर्लोकनासाठी उपलब्ध आहे.**

**ज्या गुंतवणूकदारांनी** आधीची अंतिम मुदत चुकवली आहे त्यांना या संधीचा फायदा घेण्यासाठी कंपनीच्या रजिस्ट्रार आणि शेअर ट्रान्सफर एजंट म्हणजेच एमयूएफजी इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड (पूर्वी लिंक इनटाईम इंडिया प्रायव्हेट लिमिटेड म्हणून ओळखले जाणारे) यांना सी-१०१, एम्बासी २४७, एलबीएस मार्ग, विक्रोळी (पश्चिम) मुंबई -४०००८३, दूरध्वनी क्रमांक: +९१८१०८११६७६७, ईमेल : investor.helpdesk@in.mpms.mufg.com येथे आवश्यक कागदपत्रे सादर करावीत. कंपनीची वेबसाइट www.geeceeventures.com वर या विशेष विंडोच्या उद्घाटनाची माहिती देणारे परिपत्रक अपडेट करण्यात आले आहे.

जीसी व्हेंचर्स लिमिटेडसाठी
सही/-
कु. दर्शना जैन
कंपनी सचिव आणि अनुपालन अधिकारी

**ठिकाण : मुंबई**
**दिनांक : जानेवारी ०१, २०२६**

### punjab national bank ...the name you can BANK upon!

**बीओ : वांद्रे लिंकिंग रोड (००८२००)**
प्लॉट क्रमांक २३७ बाबा हाऊस २७ वा रोड वांद्रे पश्चिम मुंबई - ४०००५०
दूरध्वनी : २६४२०४५६/२६४२६१७४.

**लॉकर तोडून उघडण्याची सूचना**

सर्व संबंधितांना, खाली नमूद केलेल्या लॉकर धारकांना सूचित केले जाते की त्यांच्या नावांसमोर नमूद केलेले लॉकर भाडे आमच्या अनेक सूचना असूनही थकीत आहे. म्हणून आम्ही सूचित करतो की जर प्रकाशनाच्या तारखेपासून तीन महिन्यांच्या आत संपूर्ण थकीत भाडे भरले नाही, तर लॉकर करारानुसार लॉकर तोडून उघडले जाईल आणि लॉकर करारानुसार लॉकरमध्ये आढळलेल्या वस्तू विकून भाडे वसूल केले जाईल. लॉकर तोडून उघडण्यासाठीचा सर्व खर्च लॉकर धारकाने थकीत लॉकर भाड्याव्यतिरिक्त करावा लागेल. आम्ही येथे खालील सूचीबद्ध लॉकर धारकांना विनंती करतो की त्यांनी त्यांच्या संबंधित लॉकरचे देय भाडे वरील कालावधीत त्वरित भरावे, अन्यथा वर नमूद केलेली कारवाई सुरू केली जाईल.

| अ. क्र. | लॉकर क्र. | लॉकर धारकाचे नाव आणि पत्ता | जास्त भाडे/देय भाडे |
|---|---|---|---|
| १ | एक्सएक्सएक्सएक्स५७९ | **सावित्री देवी जे. सिंग /कपिल सिंग बाबू :** सुबसरंगी सोसायटी, प्लॉट नं. २६०, रूम नंबर सी/४ बोरिवली वेस्ट, गोराई, मुंबई-४०००९१ | रु. १९४७०.०० /०६/११/२०२० |
| २ | एक्सएक्सएक्सएक्स२७३ | **वाशुमल जेठानंद आणि श्रीमती पुष्पा जेठानंद :** १, किरण अपार्टमेंट, २४ वा रोड वांद्रे पश्चिम, मुंबई-४०००५० | रु. १९४७०.०० /२१/१२/२०२० |
| ३ | एक्सएक्सएक्सएक्स१०२२ | **ज्योती नारायणदास नवानी :** ईएलसीआयडी, ६ वा मजला, डॉ. आंबेडकर रोड, वांद्रे (प), मुंबई ४०० ०५०. | रु. १९४७०.०० /२९-११-२०२० |
| ४ | एक्सएक्सएक्सएक्स१९१ | **विद्यावती टंडन आणि राजू टंडन :** ३, किंचिन बिल्डिंग, १४ वा रोड, खार, मुंबई-४०००५२ | रु. १२१९४.०० /१०/०२/२०२१ |
| ५ | एक्सएक्सएक्सएक्स१११ | **मनजीत एच असरानी /तिया मनजीत असरानी :** ९०१ इरा छाया बिल्डींग, १९ वा रोड, खार (प), मुंबई-४०००५२ | रु. २४८९२.०१/१५-०९-२०२० |
| ६ | एक्सएक्सएक्सएक्स२५२ | **रमेश भाटिया :** फ्लॅट क्रमांक २, सी ग्लिम्प्स बिल्डिंग, बी जे रोड, बँड स्टँड, वांद्रे पश्चिम, मुंबई-४०००५० | रु. १२३९०.०० /३१/१२/२०२० |
| ७ | एक्सएक्सएक्सएक्स५६७ | **कमलबेन मेहता/ वसंतलाल रतीलाल मेहता/ रुईया वसंत मेहता :** ६०७बी, मंजू महल, पाली हिल, वांद्रे, मुंबई - ४०००५० | रु. १५९३०.०० /२८/०६/२०२० |
| ८ | एक्सएक्सएक्सएक्स४५५ | **नेहा राहुल मेहता /राहुल सूरज मेहता :** ९, मेरी निकेतन, माउंट मेरीज रोड वांद्रे पश्चिम, मुंबई-४०००५० | रु. १९४७०.०० /२९/११/२०२० |
| ९ | एक्सएक्सएक्सएक्स१०६४ | **किरण पेसवानी :** ४ कोहिनूर पॅलेस, १४ वा रोड, खार (प), मुंबई-४०००५२ | रु. १९४७०.०० /०७-१०-२०२० |
| १० | एक्सएक्सएक्सएक्स४२१ | **नवलीन कौर आणि मनप्रीत सिंग :** १०/२३ केहर हाऊस/घई व्हिला, एन.एस. रोड नंबर १, जेव्हीपीडी स्कीम, आझाद नगर सोसायटी, विलेपार्ले पश्चिम, मुंबई-४०००५६ | रु. १९९७७.०० /२९/०१/२०२१ |
| ११ | एक्सएक्सएक्सएक्स२०२ | **फरजाना हम्माद :** नॉर्थ बॉम्बे सीएच एस लिमिटेड जुहू, मुंबई-४०००४९ | रु. २००४७.९९ /३०/०१/२०२१ |
| १२ | एक्सएक्सएक्सएक्स२८३ | **गोविंदजी जे. संपत/ सुष्मा जी संपत/ अल्का संपत/ एन जी संपत :** क्र. १६, गंगा गृह, २ रा मजला, सर विठ्ठल दास नगर, नॉर्थ अव्हेन्यु, सांताक्रुझ पश्चिम, मुंबई ४०० ०५४. | रु. १८९६६.५८ /२०/११/२०२० |

**तारीख : ०१.०१.२०२६**
**ठिकाण : मुंबई**

**सही/-**
**अधिकृत अधिकारी**
**पंजाब नॅशनल बँक**

### बँक ऑफ़ बड़ौदा Bank of Baroda

**रिजनल स्ट्रेस्ड असेट रिकव्हरी शाखा,** एमएमडब्ल्यूआर, सहावा मजला, बडोदा हाऊस, दिवाण शॉपिंग सेंटरच्या मागे, एसव्ही रोड, जोगेश्वरी (पश्चिम) मुंबई-४००१०२, **ईमेल :** sarmmw@bankofbaroda.co.in

**ताबा सूचना** (स्थावर मालमत्तेसाठी)

ज्याअर्थी,

बँक ऑफ बडोदाचे अधिकृत अधिकारी म्हणून, सिक्युरिटीजेशन अँड रिकन्स्ट्रक्शन ऑफ फायनान्शियल ॲसेस्ट्स अँड एन्फोर्समेंट ऑफ सिक्युरिटी इंटरेस्ट ॲक्ट, २००२ अंतर्गत आणि सिक्युरिटी इंटरेस्ट (एन्फोर्समेंट) रूल्स, २००२ च्या नियम ३ सह वाचलेल्या कलम १३ (१२) अंतर्गत दिलेल्या अधिकाराचा वापर करून, त्यांनी ३०.०८.२०२४ रोजी आणि २६.११.२०२४ रोजीच्या पेपर प्रकाशनानुसार, सदर कायद्याच्या कलम १३(२) अंतर्गत, कर्जदार श्री. चंद्रकांत एन. आरास यांना २६.०८.२०२४ रोजीच्या सूचनेमध्ये नमूद केलेली रक्कम **रु. ४६,४९,९४०.१८ (रुपये सेहेचाळीस लाख एकोणपन्नास हजार नऊशे चाळीस व अठरा पैसे फक्त)** परत करण्याचे आवाहन केले आहे जे ही सूचना मिळाल्यापासून ६० दिवसांच्या आत कराराच्या दराने **अधिक खर्च, शुल्क आणि खर्चासह देयकाच्या तारखे**पर्यंतचे पुढील व्याज भरावे.

कर्जदाराने रक्कम परतफेड करण्यात अयशस्वी झाल्यामुळे, कर्जदाराला आणि सर्वसामान्य जनतेला सूचना देण्यात येते की, अधोस्वाक्षरीकर्त्याने सुरक्षा हितसंबंध (अंमलबजावणी) नियम, २००२ च्या नियम ८ सह वाचलेल्या कायद्याच्या कलम १३ च्या उपकलम (४) अंतर्गत त्यांना देण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करून, येथे वर्णन केलेल्या मालमत्तेचा प्रत्यक्ष ताबा **३० डिसेंबर २०२५ रोजी** घेतला आहे.

कर्जदार/जामीनदार/गहाणखतदार आणि सर्वसाधारणपणे जनतेला याद्वारे सावध करण्यात येते की त्यांनी मालमत्तेशी व्यवहार करू नये आणि मालमत्तेशी संबंधित कोणत्याही व्यवहारासाठी बँक ऑफ बडोदाकडून २६.०८.२०२४ रोजी **रु. ४६,४९,९४०.१८ (रुपये सेहेचाळीस लाख एकोणपन्नास हजार नउशे चाळीस व अठरा पैसे मात्र)** शुल्क आकारले जाईल आणि त्यावर करारानुसार व्याज आणि देयकाच्या **तारखेपर्यंतचे खर्च, शुल्क आणि खर्च यासह आकारले जातील.**

कर्जदाराचे लक्ष कायद्याच्या कलम १३ (८) मधील तरतुदींकडे आकर्षित केले आहे, ज्यामध्ये सुरक्षित मालमत्ता परत करण्यासाठी उपलब्ध असलेल्या वेळेचा समावेश आहे.

**स्थावर मालमत्तेचे वर्णन**

फ्लॅट क्रमांक ११०४, ११ वा मजला, अव्हेन्यू-१, रुस्तमजी एव्हरशाईन ग्लोबल सिटी, गाव-डोंगरे, तालुका-वसई, जिल्हा-पालघर, महाराष्ट्र-४०१४०४ चा तो सर्व भाग आणि भूखंड.

**तारीख : ३०/१२/२०२५**
**ठिकाण : वसई**

**(विनय भूषण)**
**प्राधिकृत अधिकारी**
**(बँक ऑफ बडोदा)**

### PUBLIC NOTICE

KNOWN ALL PUBLIC SHALL COME, that My Client MOHAMMED REJU KALU SHAIKH, residing at Flat No. 506 , NEW AAKAR CO.OP. HSG. SOCIETY LTD, Cancer Hospital Marol-Maroshi Road, Marol, Andheri East Mumbai – 400 059.

My client say that his mother late AYASHABIBI KALU SHAIKH had acquired the flat i.e. Flat No. 506 , NEW AAKAR CO.OP. HSG. SOCIETY LTD, Cancer Hospital Marol-Maroshi Road, Marol, Andheri East Mumbai – 400 059 from BRIHANMUMBAI MAHANAGARPALIKA vide Allotment letter bearing No. AE(M)B/40/P dated 19/07/2006 and holding share certificate no. 66 , 05 fully paid up Shares of Rs. 50/- (Rupees Fifty only) each Distensive from 326 to 330 both inclusive of society.

My clients say that Late AYASHABIBI KALU SHAIKH expired on 22/02/2021, leaving behind my client (1) MOHAMMED RASHID KALU SHAIKH, expired on 05/06/2016 (2) MOHAMMED TAHIR KALU SHAIKH expired on 29/11/2021 (3) MOHAMMED HASANALI KALU SHAIKH (4) SULEKHA KALU SHAIKH, as her legal heirs and representatives of deceased.

My client say that MIRJAHAN SHEKH 2) LALBANU BIBI 3) ZUBEDA MOHAMMED HUSSAIN PATHAN relinquished their share vide NOC duly notarized done by IQBAL U.R. QURESHI bearing register No. 982, page no 52 and Book no 11 on dated 6th October 2025 in favour of MOHAMMED REJU KALU SHAIKH.

Any person/s or other heirs, if any, claiming right or having any objection towards the legal hireship and Ownership in above mentioned Flat should lodge their claim to the undersigned within 14 days from date of publication of notice to the undersigned with cogent evidence else letter on no claim shall be entertained.

Place : Mumbai. Date : 01/01/2026
**J. P. TRIPATHI** (Advocate High Court)
Office: Abdul Aziz Chawl, 24, Room No.4, L.B.S. Marg, Navpada, Kurla (W), Mumbai- 400 070.

### जाहिर नोटीस

या जाहिर नोटीसीद्वारे तमाम लोकांस कळविण्यांत येते की, **गॉव मौजे नवघर, वसई रोड (प), ता. वसई, जि. पालघर,** येथिल सर्वे नं. १७/अ, **सदनिका क्र. २०३, दुसरा माळा, क्षेत्र ४५० चौ. फुट.** बिल्ट अप **अंबिका निवास को. ऑप. हौ. सो. लि.** सदर सदनिका **(१). श्री. दिवाकर रामनारायण लालदास, (२). श्रीमती. रेणु दिवाकर लालदास** यांची मालकीची होती, त्यांनी सदरहू सदनिका **श्री. मुरलीधर जे. भट्ट** ह्यांचे कडून **दि. १८/१२/२००३** रोजी कराराने विकत घेतलेले होते व आहे. **श्री. दिवाकर रामनारायण लालदास** हे दि. २६/१२/२०२१ रोजी मयत झाले असून त्यांना कायदेशीर वारस म्हणून **१). श्रीमती. रेणु दिवाकर लालदास (पत्नी), २). श्री. पियुश दिवाकर लालदास (मुलगा), ३). प्रेरणा दिवाकर लालदास (मुलगी), ४). प्रतिक्षा दिवाकर लालदास (मुलगी),५). प्रिया दिवाकर लालदास (मुलगी)** त्यांच्या मृत्युच्या वेळी उत्तराधिकारी करणारे वारस म्हणून **श्रीमती. रेणु दिवाकर लालदास** हि कोणत्याही व्यक्ति बरोबर सदनिकेची विक्रीच्या व्यवहार करु शकतात कोणाही व्यक्ति व संस्थेचा कोणत्याही प्रकारचा हक्क, अधिकार, वारसा हक्क द्वारे उक्त सदनिकेवर किंवा त्यावर कोणताही दावा अथवा हितसंबध असल्यास त्यांनी सदरची नोटीस प्रसिद्व झालेपासून १४ (चौदा) दिवसांचे आत सर्व त्या लेखी कागदोपत्री पुराव्यासहित माझे ऑफिस नं. ०२, वसंत को. ऑप. हौ. सो. लि मौजे दिवाणमान, विशाल नगर, वसई रोड (प.), ता. वसई, जि. पालघर, (मोबाईल नंबर:- ९८९०५३३९६१) येथे सादर करावीत, अन्यथा तसा कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा हक्क वा अधिकार नाही व असल्यास तो सोडून देण्यात आलेला आहे असे समजून सदरहू सदनिकेची विक्रीच्या व्यवहार कोणाही व्यक्ति बरोबर पूर्ण करण्यात येईल, यांची सर्व संबधितानी नोंद घ्यावी.

**(अनिल एम. राजभर)**
दिनांक : ०१/०१/२०२६ **वकिल.**

### सार्वजनिक सूचना

याद्वारे सूचना देण्यात येते की, श्रीमती नलिनी नवीन दवे (विधवा), श्री. जयेश नवीन दवे (मुलगा), श्रीमती प्रतीक्षा नवीन दवे (मुलगी) आणि श्री. लोमेश नवीन दवे (मुलगा) **(यापुढे माझे क्लायंट म्हणून संदर्भित)** हे दिवंगत नवीन आर. दवे (नवीनचंद्र रतिलाल दवे) यांचे हयात कायदेशीर वारस आहेत, ज्यांचे १४ फेब्रुवारी १९८६ रोजी मुंबई येथे निधन झाले, बृहन्मुंबई महानगरपालिका, ए वॉर्डने जारी केलेल्या मृत्यु प्रमाणपत्र क्रमांक ९१५५४ दिनांक २७ फेब्रुवारी १९८६ नुसार आहे. सदर मृत व्यक्ती स्थावर मालमत्तेचे मालक/सह-मालक होते, ज्यांचे वर्णन खालीलप्रमाणे केले आहे : साई प्रेम अपार्टमेंट / न्यू ओम साई प्रेम को-ऑप. एचएसजी सोसायटी लिमिटेड या नावाने ओळखल्या जाणाऱ्या इमारतीत, जो दुसऱ्या मजल्यावरील फ्लॅट क्रमांक २०१ आहे, सुमारे ४३० चौरस फूट बिल्ट-अप क्षेत्रफळ (३९.९६ चौरस मीटरच्या समतुल्य) आहे. ही इमारत मीरा भाईंदर महानगरपालिकेच्या हद्दीत आणि उपनिबंधक, ठाणे यांच्या हद्दीत असलेल्या राम मंदिर रोड क्रमांक ४, महावीर ज्योत, स्टेशन रोड, भाईंदर पश्चिम, तालुका आणि जिल्हा ठाणे येथे आहे. वारसा आणि वारसा हक्काच्या आधारे, हयात असलेले कायदेशीर वारस श्रीमती नलिनी नवीन दवे (विधवा), श्री. जयेश नवीन दवे (मुलगा), सुश्री प्रतीक्षा नवीन दवे (मुलगी) आणि श्री. लोमेश नवीन दवे (मुलगा) हे वरील बाबतीत मृत व्यक्तीच्या मालमत्तेचे आणि हक्कांचे उत्तराधिकारी आहेत. मालमत्ता खाली स्वाक्षरी करणाऱ्यांनी सदर मालमत्ता श्री. भरत कुमार मोहनलाल कामोठी आणि श्रीमती बिंदू भरत कुमार कामोठी यांना, जे फ्लॅट क्रमांक २०१, न्यू ओम साई प्रेम को-ऑप. एचएसजी सोसायटी लिमिटेड, राम मंदिर रोड क्रमांक ४, महावीर ज्योत, स्टेशन रोड, भाईंदर पश्चिम, ठाणे येथे राहतात, ९ मे २०१२ रोजीच्या विक्री कराराद्वारे विकली, हस्तांतरित केली आणि हस्तांतरित केली आहे जी ११ मे २०१२ रोजी ठाणे-७ च्या उपनिबंधक कार्यालयात दस्तऐवज क्रमांक ३४८७/२०१२ म्हणून नोंदणीकृत आहे.

सदर मालमत्तेवर किंवा तिच्या कोणत्याही भागावर वारसा, गहाणखत, शुल्क, धारणाधिकार, ताबा, परवाना, भाडेपट्टा, सुविधा किंवा इतर कोणत्याही प्रकारे कोणताही दावा, हक्क, मालकी हक्क, हितसंबंध, हिस्सा, मागणी किंवा आक्षेप असलेल्या कोणत्याही व्यक्तीला किंवा कायदेशीर वारसांना, या सूचना प्रकाशित झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांच्या आत सर्व सहाय्यक कागदपत्रांसह खाली नमूद केलेल्या पत्त्यावर असा दावा किंवा आक्षेप नोंदविण्याचे आवाहन केले जाते. जर उपरोक्त कालावधीत कोणताही दावा/आक्षेप प्राप्त झाला नाही, तर असे गृहीत धरले जाईल की सदर मालमत्तेच्या संदर्भात कोणतेही दावे, हक्क, मालकी हक्क, हितसंबंध किंवा कोणत्याही स्वरूपाचे आक्षेप नाहीत आणि खरेदीदारांना या आधारावर पुढे जाण्याचे स्वातंत्र्य असेल की खरेदीदारांचे मालकी हक्क स्पष्ट, विक्रीयोग्य आणि सर्व भारांपासून मुक्त आहे आणि त्यानंतर कोणतीही व्यक्ती कोणताही हक्क, मालकी हक्क किंवा हितसंबंध दावा करणार नाही.

ठिकाण : मुंबई तारीख : ०१.०१.२०२६
**घनश्याम यादव** (उच्च न्यायालयाचे वकील)
कार्यालय : तिसरा मजला, अंधेरी कोर्ट बार असोसिएशन, अंधेरी पूर्व, मुंबई- ४००० ६९